सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सर्वसाधारण प्रशासक सभा क्रमांक - ११/२०२४-२०२५

सभेची नोटीस

ज्या अर्थी, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदीनुसार विविध कामकाज पार पाडण्यासाठी प्रस्तावित प्रस्तांवाना सर्वसाधारण सभेची पुर्व मान्यता देणे आवश्यक आहे आणि,

ज्या अर्थी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ६, ६(अ) मधील तरतुदीनुसार सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका नगरमंडळाची मुदत दि.१९ ऑगस्ट २०२३ रोजी संपुष्टात आलेली असल्याने सद्य:स्थितीत सर्वसाधारण सभा अस्तित्वात नाही, आणि,

ज्या अर्थी, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाखाली सर्व अधिकारांचा वापर करण्यासाठी आणि तिची सर्व कामे व कर्तव्ये पार पाडण्यासाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या प्रशासक पदी आयुक्त,सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका यांची दि.२४/०८/२०२३ रोजीचे मा.शासन आदेशान्वये नियुक्ती करण्यात आलेली आहे.

त्या अर्थी, सर्वसाधारण सभेच्या मान्यतेने पार पाडावयाचे कामकाज पुर्ण करण्यासाठी प्रशासक यांच्या अध्यक्षतेखाली **शुक्रवार दि.११/१०/२०२४ रोजी दुपारी १२.३० वाजता महानगरपालिका मुख्यालय येथील कै.राजाभाऊ हरिभाऊ जगदाळे सभागृह, सांगली** येथे सभा आयोजित केली आहे. सदर सभेमध्ये खालील परिशिष्ठातील विषय विचाराधीन आहेत. तरी सदर सभेस सर्व संबंधीत अधिकारी यांनी उपस्थित रहावे.

परिशिष्ठ

१. मागील सर्वसाधारण प्रशासक सभा दि.०९/१०/२०२४ रोजीचे कार्यवृत्त वाचून कायम करणे.

२. सन २०२४-२५ महानगरपालिका अर्थसंकल्पामध्ये लेखाशिर्ष E-१२३९) सन २०२१-२२ मुलभूत सोयी सुविधा विकास योजना मंजूर प्रकल्प ५ कोटी पैकी शासन हिस्सा ७५% र.रु.३,७५,००,०००/- मात्र तरतुद करणेस मान्यता देणेकामी **अतिरिक्त आयुक्त (बांधकाम विभाग) यांचे दि.२४/०९/२०२४ रोजीचे विषयपत्र.**

३. CANTILIVER, T आकाराची होर्डिंग (युनिपोल), कमान उभे करणे, LED,KIOSK (३X५ मापाचे स्ट्रीट लाईट पोलवरील बोर्ड) बाबत धोरण निश्चित करणेस, स्ट्रीट लाईट पोलची संख्या विद्युत अभियंता यांचेकडून निश्चित करुन घेऊन, प्रिमियमचा ई-लिलाव करणेस मान्यता देणेकामी **उपायुक्त (मालमत्ता विभाग) यांचे दि.१०/१०/२०२४ रोजीचे विषयपत्र.**

४. बॅनर,बोर्ड,फलक लावण्यास परवानगी,विना परवाना दंड निष्कासन इत्यादीबाबत सहा.आयुक्त प्रभाग समिती क्र.१,२,३ व ४ यांना अधिकारी प्रधान करणेस मान्यता देणेकामी **उपायुक्त (मालमत्ता विभाग) यांचे दि.१०/१०/२०२४ रोजीचे विषयपत्र.**

५. देशव्यापी व्हाईस ऑफ मिडिया या पत्रकार संघटनेच्या कार्यालयासाठी त्यांनी मागणी केलेली मिरज हजरत ख्वाजा शॉपिंग सेंटर,पहिल्या मजल्यावरील दोन खोल्या महापालिकेच्या शर्ती-अटीनुसार भाडेमुल्य निश्चित करुन भाड्याने देणेस मान्यता देणेकामी **उपायुक्त (मालमत्ता विभाग) यांचे दि.१०/१०/२०२४ रोजीचे विषयपत्र.**

६. महाराष्ट्र महानगरपालिका (स्थावर मालमत्ता भाडेपट्टा नुतनीकरण अथवा हस्तांतरण) नियम २०१९ आणि महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग-४(ब) दि.०६ नोव्हेंबर २०२३ व दि.०७ नोव्हेंबर २०२३ अन्वये सांगली व मिरज विभागातील गाळ्यांच्या भाड्यातील सुधारणा व दर निश्चिती करणेस मान्यता देणेकामी **उपायुक्त (मालमत्ता विभाग) यांचे दि.१०/१०/२०२४ रोजीचे विषयपत्र.**

७. महाराष्ट्र महानगरपालिका (स्थावर मालमत्ता भाडेपट्टा नुतनीकरण अथवा हस्तांतरण) नियम २०१९ आणि महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग-४(ब) दि.०६ नोव्हेंबर २०२३ व दि.०७ नोव्हेंबर २०२३ अन्वये सांगली येथील स्टेशन चौकातील सर्व गाळ्यांच्या भाड्यातील सुधारणा व दर निश्चिती करणेस मान्यता देणेकामी **उपायुक्त (मालमत्ता विभाग) यांचे दि.१०/१०/२०२४ रोजीचे विषयपत्र.**

८. श्री.गणेश मार्केट सांगली मधील जुने रेल्वे स्टेशन,सांगली येथील दुकान गाळे संरक्षणासाठी बांधलेल्या पोलिस चौकीचे मनपा शर्ती-अटीनुसार हस्तांतरण करणेस मान्यता देणेकामी **उपायुक्त (मालमत्ता विभाग) यांचे दि.१०/१०/२०२४ रोजीचे विषयपत्र.**

९. महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये स्वच्छ भारत अभियान २ अंतर्गत ओला व सुका कचरा Transfer Station उभारणीचे अनुषंगाने सविस्तर प्रकल्प अहवाल मा.शासन मान्यता प्राप्त नियुक्त एजन्सीधारक Samarth Engineers, Pune यांचेकडून करुन घेणेस, करारपत्र करणेस व याकामी येणारे र.रु.३०,५३,९८२/- मात्र फी अदा करणेस मान्यता देणेकामी **उपायुक्त (आरोग्य विभाग) यांचे दि.०९/१०/२०२४ रोजीचे विषयपत्र.**

मा.प्रशासक तथा आयुक्तसो यांचे आदेशानुसार

प्र.महापालिका सचिव,
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सर्वसाधारण प्रशासक सभा क्रमांक :- ११/२०२४-२५

सर्वसाधारण प्रशासक ठराव क्रमांक :- १२४ **दिनांक :- ११/१०/२०२४**

विषय क्रमांक :- ०१

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील दि.२४/०८/२०२३ रोजीचे आदेशान्वये प्रशासक म्हणून प्राप्त अधिकारानुसार सर्वसाधारण सभेच्या अधिकारांन्वये,

मागील सर्वसाधारण प्रशासक सभा दि.०९/१०/२०२४ रोजीच्या कार्यवृत्तातील ठराव क्र.११७ ते ठराव क्र.१२३ चे कार्यवृत्त वाचून ही सभा सर्वानुमते कायम करीत आहे.

(शुभम गुप्ता भा.प्र.से.)
प्रशासक तथा आयुक्त
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महाराणा सिद्धीक
महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सर्वसाधारण प्रशासक सभा क्रमांक :- ११/२०२४-२५

सर्वसाधारण प्रशासक ठराव क्रमांक :- ५२५ **दिनांक :-** ११/१०/२०२४

विषय क्रमांक :- ०२

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील दि.२४/०८/२०२३ रोजीचे आदेशान्वये प्रशासक म्हणून प्राप्त अधिकारानुसार सर्वसाधारण सभेच्या अधिकारांन्वये,

सोबतचे अतिरिक्त आयुक्त (बांधकाम विभाग) यांचे दि.११/१०/२०२४ रोजीचे विषयपत्र अवलोकनी घेतले.

सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिकेस शासनाकडून सन २०२३-२४ सालाकरीता सन २०२१-२२ मुलभूत सोयी सुविधा विकास योजना मंजुर प्रकल्प ५ कोटी मंजुर झाले होते. सदरची रक्कम सन २०२३-२४ मार्च अखेर मनपा प्राप्त होणार होती. मात्र ती दि.३१/०३/२०२४ अखेर महापालिकेस प्राप्त झालेली नाही. सदरचा निधी विहित मुदतीत खर्च होण्याच्या दृष्टीने शासन अनुदानातून मंजूर असलेल्या कामांच्या निविदा प्रक्रिया पुर्ण होवून मंजूर मक्तेदार यांना कार्यारंभ आदेशही देणेत आलेले आहेत. तसेच काही कामे पुर्ण आहेत व काही कामे पुर्ण आहेत व काही कामे प्रगतीत आहेत. तरी शासनाकडून सदर रक्कम सन २०२४-२५ मध्ये प्राप्त होणार आहे.

यासाठी सन २०२४-२५ महानगरपालिका अर्थसंकल्पातील लेखाशिर्ष E-१२३९) सन २०२१-२२ मुलभूत सोयी सुविधा विकास योजना मंजूर प्रकल्प ५ कोटी पैकी शासन हिस्सा ७५% या लेखाशिर्षात सन २०२४-२५ या अर्थसंकल्पामध्ये र.रु.१,००,०००/- मात्र इतकी तरतुद केली असून, प्रत्यक्षात रु.५ कोटी पैकी ७५% प्रमाणे र.रु.३,७५,००,०००/- इतकी तरतुद करणे आवश्यक असल्याने, सन २०२१-२२ मुलभूत सोयी सुविधा विकास योजना मंजूर प्रकल्प ५ कोटी पैकी ७५% प्रमाणे र.रु.३,७५,००,०००/- इतकी रक्कम महानगरपालिका अर्थसंकल्पातील लेखाशिर्ष E-१२३९) सन २०२१-२२ मुलभूत सोयी सुविधा विकास योजना मंजूर प्रकल्प ५ कोटी पैकी शासन हिस्सा ७५% र.रु.३,७५,००,०००/- मात्र सन २०२४-२५ च्या अर्थसंकल्पात तरतुद करणेस विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे.

(शुभम गुप्ता भा.प्र.से.)
प्रशासक तथा आयुक्त
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सर्वसाधारण प्रशासक सभा क्रमांक :- ११/२०२४-२५

सर्वसाधारण प्रशासक ठराव क्रमांक :- १२६ **दिनांक :-** ११/१०/२०२४

विषय क्रमांक :- ०३

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील दि.२४/०८/२०२३ रोजीचे आदेशान्वये प्रशासक म्हणून प्राप्त अधिकारानुसार सर्वसाधारण सभेच्या अधिकारांन्वये,

सोबतचे उपायुक्त (मालमत्ता विभाग,सांगली) यांचे दि.१०/१०/२०२४ रोजीचे विषयपत्र अवलोकनी घेतले.

मालमत्ता विभागाकडील उत्पन्नवाढीसाठी आणि होर्डिंग व LED स्क्रीन व्दारे तिन्ही शहरात कामानी रस्त्याच्या दर्शनी भागामध्ये कमान युनिपोल, T टाईप होर्डिंग उभे करणे, तसेच युनिपोल T आकाराचे सागांडयावर साधारणपणे ६ फुट रुंद आणि रस्त्याची लांबी रुंदी विचारात घेऊन, साधारणपणे कमानीवर ६ फुट रुंद व २० ते ३० फुट उंचीवर कमान स्टीलच्या सांगाडा उभे करणे इत्यादी कामगिरी इ. लिलावाव्दारे करणे त्याच बरोबर ज्या जागेवर कमान बसत नाही पण प्रसिध्दीच्या दृष्टीने योग्य जागा आहे, असे मत झाल्याने काही भाग T आकाराचे बोर्ड वर काही भागात युनिपोल आकाराचे बोर्ड उभे करणे व त्यावर जाहिरात प्रसिध्द केल्याने महानगरपालिकेस निरंतर उत्पन्न मिळणारआहे. त्याचा तपशील खालील प्रमाणे

अ) **CANTILIVER** :- सदर बोर्डावर ४०% भागात दिशादर्शक रस्त्यांची नांवे व ६०% भागात जाहिरात दोन्ही बाजू करिता वार्षिक १५,०००/- जागा भाडे जागा भाडयात प्रति ३ वर्षांनी १०% वाढ + जी.एस.टी. अन्य कर लिलावधारकांनी भरणे, लायसन्स फी रु. ३०,०००/- मात्र, नुतनीकरण फी र. रु. १५०००/- महानगरपालिकेस प्रिमियम स्वरुपात १० वर्षासाठी र.रु. १,००,०००/- मात्र विना परतावा रक्कम देणे, तसेच महानगरपालिकेची स्वत:ची जाहिरात ३६५ दिवसा पैकी १५ दिवस विना मोबदला प्रसिध्द करणे.

ब) **T आकाराची होर्डिंग (युनिपोल)** :- सदर बोर्डावर ४०% भागात दिशादर्शक रस्त्यांची नांवे व ६०% भागात जाहिरात दोन्ही बाजूस वार्षिक १५,०००/- जागा भाडे जागा भाडयात प्रति ३ वर्षांनी १०% वाढ + जी.एस.टी. अन्य कर लिलावधारकांनी भरणे, लायसन्स फी रु. ३०,०००/- मात्र, नुतनीकरण फी र.रु. १५०००/- महानगरपालिकेस प्रिमियम स्वरुपात १० वर्षासाठी र.रु. १,००,०००/- मात्र विना परतावा रक्कम देणे, तसेच महानगरपालिकेची स्वत:ची जाहिरात ३६५ दिवसा पैकी १५ दिवस विना मोबदला प्रसिध्द करणे.

क) **कमान उभे करणे** – सदर बोर्डावर ४०% भागात दिशादर्शक रस्त्यांची नांवे व ६०% भागात जाहिरात दोन्ही बाजूस होर्डिंगसाठी म्हणून वार्षिक २५,०००/- जागा भाडे जागा भाडयात प्रति ३ वर्षांनी १०% वाढ + जी.एस.टी. अन्य कर लिलावधारकांनी भरणे, लायसन्स फी रु. ४५,०००/- मात्र, नुतनीकरण फी र.रु. २२५००/- महानगरपालिकेस प्रिमियम स्वरुपात १० वर्षासाठी र.रु. १,२५,०००/- मात्र विना परतावा रक्कम देणे, तसेच महानगरपालिकेची स्वत:ची जाहिरात ३६५ दिवसा पैकी १५ दिवस विना मोबदला प्रसिध्द करणे.

ख) **KIOSK (३ X ५ मापाचे स्ट्रीट लाईट पोलवरील बोर्ड)** :- सदर बोर्डावर दोन्ही भागात जाहिरातसाठी दर हे -५०००/- वार्षिक जागा भाडे, र.रु. ५०००/- प्रिमियम विना परतावा राहील. लायसन्स फी रु. ३५००/- मात्र, नुतनीकरण फी र.रु. २०००/- मात्र राहील.

ख) **LED** :- वरील अ ते ख मधील जाहिरात LED मध्ये रुपांतरीत झाल्यास भाडे, लायसन्स, प्रिमियम मध्ये दुप्पट वाढ होवून, १० वर्षे मुदतीने ३ वर्षांनी १०% वाढ + जी.एस.टी. भरणे.

.. २ ..

उपरोक्त प्रमाणे सादर केलेल्या प्रस्तावानुसार, खाली नमुद केलेप्रमाणे दर निश्चित करणेत यावेत.

अ) **CANTILIVER** :- सदर बोर्डावर जाहिरात दोन्ही बाजू करिता वार्षिक १५,०००/- जागा भाडे जागा भाडयात प्रति ३ वर्षांनी १०% वाढ + जी.एस.टी., अन्य कर, लायसन्स फी रु. ३०,०००/- , नुतनीकरण फी र.रु. १५०००/- महानगरपालिकेस प्रिमियम स्वरुपात १० वर्षासाठी र.रु.७५,०००/- विना परतावा, तसेच महानगरपालिकेची स्वत:ची जाहिरात ३६५ दिवसा पैकी १५ दिवस विना मोबदला प्रसिध्द करणे.

ब) **T आकाराची होर्डिंग (युनिपोल)** :- सदर बोर्डावर जाहिरात दोन्ही बाजूस वार्षिक १५,०००/- जागा भाडे जागा भाडयात प्रति ३ वर्षांनी १०% वाढ + जी.एस.टी.,अन्य कर,लायसन्स फी रु.३०,०००/- , नुतनीकरण फी र.रु. १५०००/- महानगरपालिकेस प्रिमियम स्वरुपात १० वर्षासाठी र.रु.७५,०००/- विना परतावा, तसेच महानगरपालिकेची स्वत:ची जाहिरात ३६५ दिवसा पैकी १५ दिवस विना मोबदला प्रसिध्द करणे.

क) **कमान उभे करणे** — सदर बोर्डावर ४०% भागात दिशादर्शक रस्त्यांची नांवे व ६०% भागात जाहिरात दोन्ही बाजूस होर्डिंगसाठी म्हणून वार्षिक २५,०००/- जागा भाडे जागा भाडयात प्रति ३ वर्षांनी १०% वाढ + जी.एस.टी.,अन्य कर,लायसन्स फी रु.४५,०००/-, नुतनीकरण फी र.रु. २२५००/- महानगरपालिकेस प्रिमियम स्वरुपात १० वर्षासाठी र.रु.१,२५,०००/- विना परतावा, तसेच महानगरपालिकेची स्वत:ची जाहिरात ३६५ दिवसा पैकी १५ दिवस विना मोबदला प्रसिध्द करणे.

ख) **KIOSK (३ X ५ मापाचे स्ट्रीट लाईट पोलवरील बोर्ड)** :- सदर बोर्डावर दोन्ही भागात जाहिरातीसाठी दर र.रु.५०००/- वार्षिक जागा भाडे, र.रु. ५०००/- प्रिमियम विना परतावा. लायसन्स फी र.रु. ३५००/- नुतनीकरण फी र.रु. २०००/- राहील.

ग) **LED** :- वरील अ ते ख मधील जाहिरात LED मध्ये रुपांतरीत झाल्यास भाडे, लायसन्स, प्रिमियम मध्ये दुप्पट वाढ होवून, १० वर्षे मुदतीने ३ वर्षानी १०% वाढ + जी.एस.टी. भरणे.

वरील प्रमाणे दर निश्चित करणेस ही सभा मान्यता देत आहे. याकामी मा.स्थायी समिती ठराव क्र.११७ दि.०४/०८/२०२३ अन्वये पारित करणेत आलेला ठराव ही सभा अधिक्रमीत करीत असून, उपरोक्त नमुद प्रिमियम रक्कमेचा मनपा शर्ती-अटीनुसार ई लिलाव अंतिम करुन, ई-लिलाव मंजुर होईल त्या संस्थेस, व्यक्ती, मक्तेदार यांनी अ ते ख बाबत शहरातील जागेबाबत सर्व्हेक्षण करुन महानगरपालिका मालकीच्या जागा त्यांनी निश्चित जागेचा वरील जाहिरात लावणेकामी तयार केलेला आराखडा इकडे सादर केल्यानंतर, मनपाने निश्चित केलेल्या अधिकत्तम शर्ती-अटीसह परवानगी दिल्यानंतर प्रसिध्द करणेचे आहे.

वरील प्रमाणे धोरण निश्चित येत असून, स्ट्रीट लाईट पोलची संख्या विद्युत अभियंता यांचेकडून निश्चित करुन घेऊन, प्रिमियमचा ई-लिलाव करणेस स्थायी समितीकडे प्रस्ताव सादर करणेस ही सभा शिफारस करीत आहे.

Both pages signed,

(शुभम गुप्ता भा.प्र.से.)
प्रशासक तथा आयुक्त
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

मालमत्ता अधिकारी

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सर्वसाधारण प्रशासक सभा क्रमांक :- ११/२०२४-२५

सर्वसाधारण प्रशासक ठराव क्रमांक :- १२७ **दिनांक :-** ११/१०/२०२४

विषय क्रमांक :- ०४

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील दि.२४/०८/२०२३ रोजीचे आदेशान्वये प्रशासक म्हणून प्राप्त अधिकारानुसार सर्वसाधारण सभेच्या अधिकारांन्वये,

सोबतचे उपायुक्त (मालमत्ता विभाग,सांगली) यांचे दि.१०/१०/२०२४ रोजीचे विषयपत्र अवलोकनी घेतले.

महापालिका क्षेत्रातील प्रभाग निहाय बोर्ड, बॅनर, फलक लावणे इत्यादी कामी परवानगी देण्याचे अधिकार प्रभाग निहाय सहा.आयुक्त स्तरावर प्रदान करणेबाबतचा प्रस्ताव सादर करणेत आला आहे. त्यानुसार,

अ) ७ दिवसासाठी १० X ८ मापाचे फलक, बोर्ड, बॅनर परवानगी प्रति स्के.फुट ५०/- दराने देण्यास सहा. आयुक्त यांना अधिकार प्रदान करणे.

ब) विना परवाना बोर्ड, फलकावर दंडात्मक कारवाई म्हणून दंड र.रु. ७०००/- तर र.रु. ३०००/- निष्कासन फी निश्चित करणे.

क) दंडाची रक्कम भरणार नाही अशा होर्डींग्जधारक व त्यावरील चित्रित व्यक्तीवर महा प्रिव्हेशन ऑफ डिफेसमेंट ऑफ प्रॉपर्टी ॲक्ट १९९५ चे कलम २, ३ व ४ अन्वये गुन्हे दाखल करण्याचे अधिकारी सहा. आयुक्त यांना प्रदान करणे.

ड) (i) मालमत्ता विभागाकडील – जाहिरात फलक उभारणी शुल्क, व्दिनोंद क्र. R-0032, New code 920 1128, आणि (ii) ब-३ शुल्क / फी पासुन येणारे उत्पन्न मधील व्दिनोंद क्र. R-0070 New code 031-1589 दंडात्मक कारवाईपासून मिळणारे उत्पन्न या लेखाशिर्षावर वरील होणारी फी, दंडाची रक्कम, निष्कासन रक्कम जमा करणे.

वरील प्रमाणे अ ते ड मधील प्रस्तावास ही सभा विषयपत्रातील शिफाशीनुसार ही सभा मान्यता देत आहे.

(शुभम गुप्ता भा.प्र.से.)
प्रशासक तथा आयुक्त
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

मालमत्ता अधिकारी

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सर्वसाधारण प्रशासक सभा क्रमांक :- ११/२०२४-२५

सर्वसाधारण प्रशासक ठराव क्रमांक :- १२८ **दिनांक :-** ११/१०/२०२४

विषय क्रमांक :- ०५

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील दि.२४/०८/२०२३ रोजीचे आदेशान्वये प्रशासक म्हणून प्राप्त अधिकारानुसार सर्वसाधारण सभेच्या अधिकारांन्वये,

सोबतचे उपायुक्त (मालमत्ता विभाग,सांगली) यांचे दि.१०/१०/२०२४ रोजीचे विषयपत्र अवलोकनी घेतले.

महापालिका क्षेत्रातील विभागीय कार्यालय मिरज कडील डॉ.बाबासाहेब आंबेडकर मार्गावरील हजरत ख्वॉजा शॉपींग सेंटर, पहिल्या मजल्यावरील खोली नं. १ व २ या दोन खोल्या व्हाईस ऑफ मिडिया या आंतरराष्ट्रीय पत्रकार संघटनेच्या कार्यालयासाठी उपलब्ध करुन देणेसाठी प्रस्तावित करणेत आलेले आहे.

त्यास अनुसरून मा. सहा. संचालक, नगररचना विभाग यांनी दि.३०/०९/२०२४ रोजीचे पत्राने उक्त दोन खोल्यांचे चालू बाजारभावाप्रमाणे व शासन परिपत्रक दि.०६/११/२०२३ मधील कलम ३ मधील क्र.१ मधील तरतुदीनुसार वार्षीक भाडेपट्टा चालू बाजार मुल्याच्या ०.५% पेक्षा कमी नसलेचे नमुद करून वार्षीक भाडेमुल्य र.रु.६,४३०/- प्रति वर्ष इतके भाडे निश्चित करून दिलेले आहे.

तसेच सदर पत्रामध्ये मा. सहा. संचालक यांनी मालमत्ता विभागास खालील अटी नमुद करून कळविले आहे.

१. सदरचे संस्थेचे नोंदणी प्रमाणपत्र सादर नाही, त्याची तपासणी मालमत्ता विभागामार्फत करणेत यावी.
२. सदर इमारतीचे स्ट्रक्चरल ऑडीट करून घेणे आवश्यक आहे.
३. सदर इमारतीचा प्रस्तुत संस्थेकडून व्यवसायीक वापर होणार नाही याची दक्षता मालमत्ता विभागाने घेणेची आहे.
४. महानगरपालिकेच्या स्थावर मालमत्तेचे भाडेपट्ट्याद्वारे हस्तांतरण आणि भाडेपट्ट्याचे नुतणीकरण नियम २०२३ मधील तरतुदी प्रस्तुतकामी बंधनकारक राहतील.
५. याबाबतचे अंतिम निर्णय मा.आयुक्तसो यांचे राहतील.

वरील नमुद अटीस अधीन राहून निश्चित केलेले भाडे र.रु.६४३०/- प्रति वर्ष आणि महाराष्ट्र शासन अधिसुचना दि.०६ नोव्हेंबर २०२३ मधील ७.१ ते ७.११ यातील शर्ती अटी व अधिसुचना दि.०७ नोव्हेंबर २०२३ शासन निर्णयानुसार कार्यवाही व्हाईस ऑफ मिडिया या संघटनेस मिरज कडील डॉ.बाबासाहेब आंबेडकर मार्गावरील हजरत ख्वॉजा शॉपींग सेंटर, पहिल्या मजल्यावरील खोली नं. १ व २ या दोन खोल्या भाड्याने देणेस विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत असून, पुढील योग्यती नियमोचित कार्यवाही ठेवणेस ही सभा आदेशित करीत आहे.

(शुभम गुप्ता भा.प्र.से.)
प्रशासक तथा आयुक्त
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सर्वसाधारण प्रशासक सभा क्रमांक :- ११/२०२४-२५

सर्वसाधारण प्रशासक ठराव क्रमांक :- १२९ **दिनांक :- ११/१०/२०२४**

विषय क्रमांक :- ०६

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील दि.२४/०८/२०२३ रोजीचे आदेशान्वये प्रशासक म्हणून प्राप्त अधिकारानुसार सर्वसाधारण सभेच्या अधिकारान्वये,

सोबतचे उपायुक्त (मालमत्ता विभाग,सांगली) यांचे दि.१०/१०/२०२४ रोजीचे विषयपत्र अवलोकनी घेतले.

उपरोक्त महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग ४ (ब), दि.०६ नोव्हेंबर,२०२३ अन्वये प्रसिध्द महाराष्ट्र महानगरपालिका (स्थावर मालमत्तेचे भाडेपट्ट्याद्वारे हस्तांतरण आणि भाडेपट्ट्याचे नुतनीकरण) नियम २००३ शासन अधिसूचना अवलोकन घेऊन, महापालिका क्षेत्रातील गाळ्यांचे भाड्यातील सुधारणा करुन भाडे निश्चितीसाठी खालील प्रमाणे प्रस्ताव सादर करणेत आलेला आहे.

मुद्दा क्रं. १ - अधिसूचना मधील मुद्दा क्रं. ३ मध्ये भाडे आणि सुरक्षा ठेव निर्धारण समिती नमूद केलेली आहे.

अ) व्यावसायिक आणि औद्योगिक प्रयोजनाकरिता बाजारमूल्य निर्धारण करणे वार्षिक दर विवरणामध्ये निर्दिष्ट केलेल्या मुल्यांकन सुचनांचा विचार करुन जमिनीच्या वर्तमान बाजार मुल्याच्या ०.७% पेक्षा कमी नाही असे नमूद आहे.

ब) दि. १३/०९/२०१९ रोजी अधिसूचनेच्या पूर्वी जे दर मनपाने प्रचलित होता. त्या भाडेपट्टा दरामध्ये होणारी वाढ एकाच वेळी दुप्पट प्रमाणापेक्षा जास्त होणार नाही. भाडे निश्चितीसाठी पूर्वीचे भाडयाबाबत तुलनात्मक तक्ता विचारात घेऊन, दुकान निहाय भाडे निश्चित करणे योग्य होणार आहे.

सांगली विभाग

अ. क्र.	मार्केटचे नांव	दुकान गाळ्यांची संख्या	करारपत्र संपलेला दिनांक	प्रति दुकान गाळा वार्षिक भाडे	अधिसूचने नुसार प्रस्तावित दर २०१९ नुसार	प्रति दुकान गाळा सन २०२२-२३ ५% प्रमाणे होणारी रक्कम	प्रति दुकान गाळा सन २०२२-२३ ५% प्रमाणे भाडेवाढी प्रमाणे होणारी रक्कम	मुदत सन २०१४	किती वर्षासाठी २०२४ ते २०२५ दि.०१/०४/२०२४ ते दि.३१/०३/२०२५
१	पेठभाग भाजी मंडई	६४	३१-०३-०६	३२०५	६४१०	३२१	६७३१	३१-०३-२४	दि. ०१/०४/२०२४ ते दि. ३१/०३/२०२५
२	छ. शिवाजी भाजी मंडई	८६	३१-०३-०६	५४००	१०८००	५४०	११३४०	३१-०३-२४	दि. ०१/०४/२०२४ ते दि. ३१/०३/२०२५
३	शिराळकर दवाखान्या समोरील दुकान गाळे	११	३१-०३-०१	७२१५	१४४३०	७२२	१५१५६	३१-०३-२४	दि. ०१/०४/२०२४ ते दि. ३१/०३/२०२५
४	बाल क्रिडा उद्यान	५	३१-०३-०१	२०३०४	४०६०८	२०३०	४२६३८	३१-०३-२४	दि. ०१/०४/२०२४ ते दि. ३१/०३/२०२५
५	मंडई दुकान गाळे	३	३१-०३-०१	३९००	७८००	३९०	८१९०	३१-०३-२४	दि. ०१/०४/२०२४ ते दि. ३१/०३/२०२५
६	बापट बाल दुकान गाळे	१०	३१-०३-०१	४५००	९०००	४५०	९४५०	३१-०३-२४	दि. ०१/०४/२०२४ ते दि. ३१/०३/२०२५
७	धान्य बाजार कट्टे	३२	३१-०३-०१	३०६०	६१२०	३०६	६४२६	३१-०३-२४	दि. ०१/०४/२०२४ ते दि. ३१/०३/२०२५
८	रेवणी रोड पत्राशेड	१५	३१-०३-०१	३१८०	६३६०	३१८	६६७८	३१-०३-२४	दि. ०१/०४/२०२४ ते दि. ३१/०३/२०२५
९	जयंती चित्र मंदीर पत्राशेड कोर्ट मॅटर	१७	३१-०३-०१	२०२८	४०५६	२०३	४२५९	३१-०३-२४	दि. ०१/०४/२०२४ ते दि. ३१/०३/२०२५
१०	मटण मार्केट पत्राशेड	१७	३१-०३-०१	१३२०	२६४०	१३२	२७७२	३१-०३-२४	दि. ०१/०४/२०२४ ते दि. ३१/०३/२०२५
११	बीफ मार्केट कोर्ट मॅटर	१५	३१-०३-०१	१२०	२४०	१२	२५२	३१-०३-२४	दि. ०१/०४/२०२४ ते दि. ३१/०३/२०२५
१२	मटण मार्केट आतील दुकान गाळे	१०	३१-०३-०१	१४००	२८००	१४०	२९४०	३१-०३-२४	दि. ०१/०४/२०२४ ते दि. ३१/०३/२०२५
१३	मटण मार्केट आतील दुकाने	२०	३१-०३-०१	३६०	७२०	३६	७५६	३१-०३-२४	दि. ०१/०४/२०२४ ते दि. ३१/०३/२०२५
	एकूण :-	३०५							

... २ ...

अ. क्र.	मार्केटचे नांव	दुकान गाळ्यांची संख्या	करारपत्र संपलेला दिनांक	प्रति दुकान गाळा वार्षिक भाडे	अधिसूचने नुसार प्रस्तावित दर २०१९ नुसार	प्रति दुकान गाळा सन २०२२-२३ ५% प्रमाणे होणारी रक्कम	प्रति दुकान गाळा सन २०२२-२३ ५% प्रमाणे भाडेवाढी प्रमाणे होणारी रक्कम	सुधारित सन २०२४	किती वर्षासाठी २०२४ ते २०२५ दि. ०१/०४/२०२४ ते दि. ३१/०३/२०२५
१	लक्ष्मी मार्केट दुकाने	५१	०१/०६/९८	३२४०	६४८०	३२४	६८०४	३१-०३-२४	दि. ०१/०४/२०२४ ते दि. ३१/०३/२०२५
२	लक्ष्मी मार्केट आतील व कमानीतील दुकाने	४२	०१/०६/९८	२१६०	४३२०	२१६	४५३६	३१-०३-२४	दि. ०१/०४/२०२४ ते दि. ३१/०३/२०२५
३	लक्ष्मी मार्केट भाजीपाला स्टॉल	३६	०१/०६/९८	३६१	७२२	३६	७५८	३१-०३-२४	दि. ०१/०४/२०२४ ते दि. ३१/०३/२०२५
४	लक्ष्मी मार्केट भाजीपाला स्टॉल उत्तर बाजू व नविन	३२	०१/०६/९८	४६०	९२०	४६	९६६	३१-०३-२४	दि. ०१/०४/२०२४ ते दि. ३१/०३/२०२५
५	जुने मार्केट	१४	०१/०६/९८	१२१२	२४२४	१२१	२४४५	३१-०३-२४	दि. ०१/०४/२०२४ ते दि. ३१/०३/२०२५
६	किसान मार्केट	१४	०१/०६/९८	३६००	७२००	३६०	७५६०	३१-०३-२४	दि. ०१/०४/२०२४ ते दि. ३१/०३/२०२५
७	शिवाजी पॅव्हेलियन	२	०१/०६/९८	६८४०	१३६८०	६८४	१४३६४	३१-०३-२४	दि. ०१/०४/२०२४ ते दि. ३१/०३/२०२५
८	बालगंधर्व नाटयगृह आवार	४	०१/०६/९८	२८८०	५७६०	२८८	६०४८	३१-०३-२४	दि. ०१/०४/२०२४ ते दि. ३१/०३/२०२५
९	हजरत खॉजा शॉपिंग सेंटर	१५	०१/०६/९८	८४६०	१६९२०	८४६	१७७६६	३१-०३-२४	दि. ०१/०४/२०२४ ते दि. ३१/०३/२०२५
१०	हजरत खॉजा शॉपिंग सेंटर	२०	०१/०६/९८	२९१६	५८३२	२९२	६१२४	३१-०३-२४	दि. ०१/०४/२०२४ ते दि. ३१/०३/२०२५
११	दवाखाना केबीन	१५	०१/०६/९८	१८२५	३६५०	१८३	३८३३	३१-०३-२४	दि. ०१/०४/२०२४ ते दि. ३१/०३/२०२५
१२	गणेश मार्केट दुकान	१९	३१/०३/१६	२३०५२	४६१०४	२३०५	४८४०९	३१-०३-२४	दि. ०१/०४/२०२४ ते दि. ३१/०३/२०२५
१३	गणेश मार्केट हॉकर स्टॉल तांदूळ मार्केट	११	०८/०९/१०	२५९२	५१८४	२५९	५४४३	३१-०३-२४	दि. ०१/०४/२०२४ ते दि. ३१/०३/२०२५
१४	गणेश मार्केट पुजा स्टॉल	४४	३१/०३/१६	३९८८	७९७६	३९९	८३७५	३१-०३-२४	दि. ०१/०४/२०२४ ते दि. ३१/०३/२०२५
१५	महासाधु आण्णा शॉपिंग सेंटर अ बाजू कोर्ट मॅटर	२२	३१/१२/९२	४८४८	९६९६	४८५	१०१८१	३१-०३-२४	दि. ०१/०४/२०२४ ते दि. ३१/०३/२०२५
१६	आण्णाबुवा शॉपिंग सेंटर व बाजू	२६	३१/१२/९२	१९८६	३९७२	१९९	४१७१	३१-०३-२४	दि. ०१/०४/२०२४ ते दि. ३१/०३/२०२५
	एकूण :-	374							

न्यायलयीन प्रकरणे

अ.क्र.	मार्केट नांव	एकूण गाळे	तपशील
१	जयश्री चित्र मंदीर पत्राशेड	१७	
२	बीफ मार्केट	१५	
३	सिंधी मार्केट	५१	मा. महासभा ठराव क्रं. १३२/ दि. १७/०१/२०१५ हा मा. शासनाकडे विखंडीत करण्यासाठी दि. १४/०९/२०१५ रोजी प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे. त्यावर मा. शासनाने दि. १८ नोव्हेंबर २०२२ रोजी म्हणणे सादर करण्यातबाबत आदेशीत केलेले होते. त्यानुसार सिंधी मार्केट मधील गाळे धारकांना लेखी पत्र दिलेले आहे. अद्याप सदर दुकान गाळयांच्याबाबत निर्णय प्रलंबीत आहे.
४	बाल क्रिडा उद्यान	५	
५	महासाधु आण्णा शॉपिंग सेंटर अ बाजू कोर्ट मॅटर	२२	

मा. मुख्या लेखापरीक्षकसो यांची दि १८/०९/२०२४ व दि. २५/०९/२०२४ अन्वये मा. महासभा ठराव क्र. ९४ दि. १८/०२/२००८ अन्वये सांगली व मिरज विभागातील महापालिकेचे दुकान गाळे मध्ये तीन वर्षाची २०% टक्के वाढ करण्यास मान्यता झालेली होती.

सांगली विभागात साधारणपणे १३ मार्केटमध्ये ३०५ दुकान गाळे आहेत. तर मिरज विभागात साधारणपणे १६ मार्केट मध्ये ३७४ दुकान गाळे आहेत. सांगली विभागात असलेली दुकान गाळाचे करारपत्र व मुदत २००१ व २००६ या काळात संपलेली असून त्यानंतर प्रशासनाने महासभेस निर्णयासाठी प्रस्ताव देखील सादर केले होते. तथापि निर्णय झाला नव्हता. तसेच मिरज विभागात साधारणपणे १९९६ व १९९८ या काळात मुदत संपलेली होती. ६५० ते ७०० दुकान गाळयाची मुदत संपलेली होती. याबाबत प्रशासनाने अहवाल महासभेस सादर केल्यानंतर वरील ठराव होऊन भाडेवाढ तीन वर्षांनी २०% करून देण्यात आली होती.

सांगली विभागात मिरज विभागातील दुकान गाळ्याचा भाड्यामध्ये वाढ होती ही बाब त्यावेळी सन्माननीय सदस्यांनी प्रशासनाच्या निदर्शनास आणून दिल्याने सांगली विभागातील दुकान गाळयांच्या भाड्यामध्ये वाढ वरील ठरावानुसार करण्यात आलेली नव्हती असे निदर्शनास येते. उलट मिरज विभागात सांगलीच्या तुलनेने कमी दुकान भाडे होते. त्यामध्ये ठरावाच्या अनुषंगाने सन २००६ नंतर २०१२-१३ यावर्षी तीन वर्ष भाडेवाढ करून सन २०१५-१६ पर्यंत भाडे केल्याची आहे असे निदर्शनास येत आहे.

सन २०२३ मध्ये मालमत्ता व्यवस्थापक यांनी वस्तुस्थितीचा अहवाल वरिष्ठ स्तरावर सादर करून सन २००८ मधील ठरावाची फरकाची भाडेवाढ होणारी रक्कम मागणी करतेवेळी परवानगी घेणे बंधनकारक असताना तसे केले नाही. ही बाब तत्कालीन मा. आयुक्तसो यांच्या निदर्शनास आल्याने दुकान भाडेधारकांनी देखील माहिती घेऊन समक्ष तक्रारी उपस्थित करून भाडेवाढ अमान्य करून भरण्यास असमर्थता दर्शवली वरून सदरची मागणी रद्द केली आहे.

या दोन्ही कारणांनी आणि मा. मुख्यलेखापरीक्षक यांनी दि २५/०९/२०२४ च्या अभिप्रायानुसार अंशतः म्हणजे मिरज विभागातील २०१५-१६ पर्यंतची भाडेवाढ गृहीत धरून सांगली विभागातील आणि उर्वरित मिरज विभागातील २०१७-१८ नंतरची भाडेवाढ ज्या ठरावाच्या आधारे केली आहे. तो ठराव मा. महासभा ठराव ९४ दि. १८/१२/२००८ अंशतः विखंडित करून सन ०७/११/२०२३ अन्वये मा. महाराष्ट्र शासन अधिसूचनानुसार निश्चित केलेल्या प्रणालीनुसार भाडेवाढ व मुदत याबाबत धोरण निश्चित करणे यास शिफारस केल्यानुसार खालील मुद्यानिहाय विभागाने सादर केलेली माहिती अवलोकनी घेऊन खाली नमुद केलेप्रमाणे मान्यतेस प्रस्ताव सादर केलेला आहे.

अ) मा. महाराष्ट्र शासन अधिसूचना दि. ०६/११/२०२३ ते दि ०७/११/२०२३ अवलोकनी घेऊन विभागाने प्रस्तावित केल्यानुसार सन २०१९ पूर्वीचे भाडे व भाड्याच्या रकमेच्या दुप्पटीपेक्षा जास्त नसणारी रक्कम सन २०१९ ची भाडेवाढ रक्कम म्हणून निश्चित करावी अशी तरतुद आहे. सांगली विभागात भाडेवाढ ही वरीलप्रमाणे करणे शक्य आहे. तथापी मिरज विभागात सन २०१५-१६ पर्यंत तीन वर्षांनी २०% वाढ केलेली असल्याने सन २०१७-१८ ते सन २०१८-१९ साठी ५% वाढ ही २०१५-१६ च्या रकमेवर घेण्यात येत आहे ती मान्य करून घेणे. सांगली आणि मिरज यामध्ये पूर्वीची भाडेवाढ विचारात घेवून, वसुल करणे त्यास मान्यता देणे.

ब) सांगली, मिरज विभागात सन २०१९ नंतर तीन वर्षानंतर म्हणजे २०२२ पर्यंतच्या रकमेवर ५% प्रमाणे भाडेवाढ करून दि. ३१/०३/२०२२ पर्यंतची रक्कम भाडेवाढ सहित मान्य करणे.

क) दि. ३१/०३/२०२३ ते ०१/०४/२०२४ व दि. ०१/०४/२०२४ ते ३१/०३/२०२५ पर्यंत वरील प्रमाणे होणारी रक्कम कायम ठेवने आवश्यक आहे. कारण सहा. संचालक नगररचना यांनी सादर केलेले मूल्यांकन हे ७% प्रमाणे हे महानगरपालिकेच्या इमारती ह्या ३० वर्षापेक्षा जास्त मुदतीच्या असल्याने घसारा वजा जाता अत्यंत अल्प असे भाडेवाढ होत असल्याचे निदर्शनास आले आहे. याबाबत सहा. संचालक नगररचना व मा. आयुक्तसो यांचे झाले मार्गदर्शनानुसार व शासन निर्णय मधील जे भाडेवाढ अधिक आहे ते ग्राहय समजण्याची तरतुद आहे. त्यास मान्य करण्यास हरकत नसल्याने दि. ०१/०४/२०२३ जे भाडे निदर्शनास येत आहे ते ग्राह्य समजून यापुढे ३ वर्षांनी ५% भाडेवाढ करुन १० वर्षे मुदतीचे लेखी करार करणे.

ड) मा. महा. शासन अधिसूचना ०७/११/२०२३ मधील कलम ७ मध्ये नमूद केल्यानुसार शर्ती अटीच्या अधीन राहून करारपत्र करणे.

आ) सन २००१ ते २००६, १९९६ ते १९९८ मधील मुदती संपलेल्या दुकान गाळे असल्याने भाडे थकबाकी, सेवाकर, जीएसटी इत्यादी सर्व वसुली सन २०१८ पूर्वीची प्रथम वसुलात आणून नवीन भाड्याबाबत नोटीस देणे.

इ) जे, भाडे नोटीस स्वीकारून ही भाडे कर भरण्यास तयार नाहीत यावर महानगरपालिका अधिनियम ८१ (ब) नुसार कारवाई करणे.

वरील प्रमाणे नमुद केलेल्या प्रस्तावास विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत असून, न्यायालयीन प्रकरणातील गाळ्याबाबत मे.न्यायालयाच्या निकालानुसार उपरोक्त महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग 4 (ब), दि.०६ नोव्हेंबर,२०२३ आणि दि.०७ नोव्हेंबर,२०२३ अन्वये प्रसिध्द महाराष्ट्र महानगरपालिका (स्थावर मालमत्तेचे भाडेपट्ट्याद्वारे हस्तांतरण आणि भाडेपट्ट्याचे नुतनीकरण) नियम २००३ शासन अधिसूचनेस अधिन राहून भाड्यातील सुधारणा व दर निश्चितीचा निर्णय घेणेस ही सभा आदेशित करीत आहे.

All pages signed.

(शुभम गुप्ता भा.प्र.से.)
प्रशासक तथा आयुक्त
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

मालमत्ता अधिक्षक

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सर्वसाधारण प्रशासक सभा क्रमांक :- ११/२०२४-२५

सर्वसाधारण प्रशासक ठराव क्रमांक :- ७३० **दिनांक :-** ११/१०/२०२४

विषय क्रमांक :- ०७

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील दि.२४/०८/२०२३ रोजीचे आदेशान्वये प्रशासक म्हणून प्राप्त अधिकारानुसार सर्वसाधारण सभेच्या अधिकारांन्वये,

सोबतचे उपायुक्त (मालमत्ता विभाग,सांगली) यांचे दि.१०/१०/२०२४ रोजीचे विषयपत्र अवलोकनी घेतले.

उपरोक्त महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग 4 (ब), दि.०६ नोव्हेबंर,२०२३ अन्वये प्रसिध्द महाराष्ट्र महानगरपालिका (स्थावर मालमत्तेचे भाडेपट्ट्याद्वारे हस्तांतरण आणि भाडेपट्ट्याचे नुतनीकरण) नियम २००३ शासन अधिसूचना अवलोकन घेऊन, महापालिका क्षेत्रातील गाळ्यांचे भाड्यातील सुधारणा करुन भाडे निश्चितीसाठी खालील प्रमाणे प्रस्ताव सादर करणेत आलेला आहे.

गणेश मार्केट, वसंतदादा मार्केट आणि साई मार्केट असे स्टेशन चौक येथे असलेले मार्केट यांचे सुधारित भाडे निश्चितीसाठी कार्यालयीन टिप्पणी क्रं. १ मध्ये प्रस्तावित केल्याप्रमाणे मा. महासभा ठरावाने आणि तत्कालीन मा. आयुक्तसो, यांनी मान्यता देवून अंमलबजावणी झाल्यानुसार त्याचे भाडे आकारणी आणि त्याचा फरक वसुलात आणून ६ व ७ नोव्हेंबर २०२३ च्या अधिसूचनेनुसार वरिल ३ मार्केट यांचे खाली नमुद केले प्रमाणे भाडे निश्चित करणे आवश्यक आहे.

सांगली विभाग

अ. क्र.	मार्केटचे नांव	दुकान गाळयांची संख्या	मुदत	प्रति दुकान गाळा वार्षिक भाडे	अधिसूचने नुसार प्रस्तावित दर २०१९ नुसार / मा. महासभा ठराव क्रं.	प्रति दुकान गाळा ३ वर्षासाठी ५% प्रमाणे २०२२-२३ अखेर	प्रति दुकान गाळा ५% प्रमाणे भाडेवाढी प्रमाणे होणारी रक्कम	मुदत सन २०२४	किती वर्षासाठी २०२४ ते २०२५ दि. ०१/०४/२०२४ ते दि. ३१/०३/२०२५
१	गणेश मार्केट	१६४	दि. ०४/१२/२००७ रोजी गाळे वाटप करण्यात आलेले आहेत, तथापी सदरचे भाडेकरु हे र.रु. १८२५/- प्रमाणे भाडे भरलेले आहे.	२५००	३६५०	५४७.५	४१९७.५	३१-०३-२४	दि. ०१/०४/२०२४ ते दि. ३१/०३/२०२५
२	वसंतदादा मार्केट	७२	सन २००९ रोजी गाळे वाटप करण्यात आलेले आहेत, तथापी सदरचे भाडेकरु हे र.रु. १८२५/- प्रमाणे भाडे भरलेले आहे.	२५००	३६५०	५४७.५	४१९७.५	३१-०३-२४	दि. ०१/०४/२०२४ ते दि. ३१/०३/२०२५
३	साई मार्केट	१८४	सन २०१६ रोजी गाळे वाटप करण्यात आलेले आहेत, तथापी सदरचे भाडेकरु हे र.रु. १८२५/- प्रमाणे भाडे भरलेले आहे.	१८२५	३६५०	५४७.५	४१९७.५	३१-०३४-२४	दि. ०१/०४/२०२४ ते दि. ३१/०३/२०२५
	एकूण :-	४२०							

१. सुधारित भाडेपट्टयाचे दर दि. १३/०९/२०१९ पासून अंमलात येतील, नव्याने निश्चित होणारे भाडेपट्टादरानुसार थकबाकी परिगणित करुन ती सन २०२३-२४ या आर्थिक वर्षात संबंधीताकडून वसुल करण्यात यावी. सन २०२३-२४ या आर्थिक वर्षात केलेल्या मुल्यांकनानुसार निश्चित अतिरिक्त भाडेपट्टयाची रक्कमेपोटी अतिरिक्त रक्कम जमा केली असल्यास, सदर रक्कम नवीन भाडेपट्टा दरानुसार समायोजित करण्यात यावी.

२. भाडेपट्टयाची रक्कम रु. ५०००/- पेक्षा जास्त असल्यास अनामत रक्कम घेणे.

३. तीन वर्षानी ५% भाडे व अनामत रक्कमे वाढ करणे.

अ) गणेश मार्केट मधील दुकान गाळेधारकांना दि. ०४/१२/२००७ पासून प्रतिवर्षी १०% भाडेवाढी प्रमाणे सन २०२३-२४ अखेर भाडेवाढ करण्यात आलेली आहे.

आ) वसंतदादा मार्केट मधील दुकान गाळेधारकांना सन २००९ पासून प्रतिवर्षी १०% भाडेवाढी प्रमाणे सन २०२३-२४ अखेर भाडेवाढ करण्यात आलेली आह

इ) साई मार्केट मधील दुकान गाळेधारकांना सन २०१६ पासून दर ३ वर्षानी २०% भाडेवाढी प्रमाणे सन २०२३-२४ अखेर भाडेवाढ करण्यात आलेली आहे.

उपरोक्त अ,आ,ई प्रमाणे केलेली भाडेवाढ रद्द करणे.

मा महासभा ठराव क्रं. १४४ दि.२०/१२/२०१९ यामध्ये निश्चित केलेले भाडे दर सुधार व प्रशासन यांनी निश्चित केलेले आहे. दि.०७/११/२०२३ च्या अधिसूचनेनुसार कार्यवाही होत असताना मा. महासभा ठराव क्रं.९४ दि.१८/१२/२००८ हा विखंडीत होणार असल्याने त्याची नोंद घेऊन, उपरोक्त नमुद तपशिलातील गणेश मार्केट, वसंतदादा मार्केट,साई मार्केट येथील दुकान गाळ्यांचे भाड्यातील सुधारीत दर निश्चित करणेस आणि उपरोक्त नमुद प्रस्तावास विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे.

Both pages signed!

(शुभम गुप्ता भा.प्र.से.)
प्रशासक तथा आयुक्त
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

मालमत्ता अधिनियम

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सर्वसाधारण प्रशासक सभा क्रमांक :- ११/२०२४-२५

सर्वसाधारण प्रशासक ठराव क्रमांक :- ९३१ **दिनांक :-** ११/१०/२०२४

विषय क्रमांक :- ०८

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील दि.२४/०८/२०२३ रोजीचे आदेशान्वये प्रशासक म्हणून प्राप्त अधिकारानुसार सर्वसाधारण सभेच्या अधिकारान्वये,

सोबतचे उपायुक्त (मालमत्ता विभाग,सांगली) यांचे दि.१०/१०/२०२४ रोजीचे विषयपत्र अवलोकनी घेतले.

सांगली शहराचे मध्यवर्ती भागात जुने रेल्वे स्टेशन सांगली येथे महानगरपालिकेने पोलिस चौकीचे बांधकाम पुर्ण करुन घेतलेले आहे. सदरची पोलिस चौकी पोलिस विभागाकडे देताना मालमत्ता विभागाकडून खालील प्रमाणे प्रस्ताव सादर करणेत आलेला आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७९ प्रमाणे नगरपालिकेच्या मालमत्तेचा विनियोग करण्यासंबंधी तरतुदी यातील ७९ (क) नुसार जागा मनपाची कोणतीही स्थावर किंवा जंगम मालमत्ता महानगरपालिकेच्या मंजुरीने भाडयाने देता येईल किंवा अभिहस्तांतरीत करता येईल.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७९ (ड) नुसार जो मोबदला घेवून महानगरपालिकेच्या मालकीची कोणतीही स्थावर मालमत्ता किंवा कोणतीही हक्क विकता येईल पट्टयाने देता येईल किंवा अन्यथा हस्तांतरीत करता येईल तो मोबदला असे अधिमुल्य भाडे किंवा अन्य मोबदला यांच्या चालू बाजार किंमतीपेक्षा कमी असता कामा नये अशी तरतुद आहे. शासन परिपत्रक : नागरी स्थानिक संस्थाच्या कामकाजाबाबत मार्गदर्शक सुचना (स्थावर मालमत्ता हस्तांतरण संदर्भात) संकिर्ण-२०१७/प्र.क्र.१२७/नवि २० दि.२५/०५/२०१८

मा.लोकलेखा समितीने सदर अहवालात सविस्तरपणे नमूद केलेले विचारात घेता त्याचप्रमाणे समितीने सदरहू अहवालात केलेल्या उपरोक्त शिफारस क्रं. ५. २५ (२) व ५.३७(२) विचारात घेता त्याअनुषंगाने नागरी स्थानिक संस्थानी त्यांच्या मालकीच्या जमिनीभाडे तत्वावर देताना / संबंधीत जमीनी कायम स्वरुपी देताना तसेच संबंधीत जमिनीचा विकास करताना पुढीलप्रमाणे कार्यपध्दती अनुसरावी व पुढील मार्गदर्शक सुचनांचे काटेकोरपणे पालन करणेबाबत खालील प्रमाणे आदेश दिलेले आहेत.

१. महानगरपालिका व नगरपरिषद / नगरपंचायती या नागरी स्थानिक संस्थाचा मालकीच्या स्थावर मालमत्ता हस्तांतरित करताना यासंबंधीच्या महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम व महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचाय व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ मधील तरतुदींचे काटेकोरपणे पालन करावे.
२. नगरपरिषद व नगरपंचायतीबाबत महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ नुसार विहित केलेले महाराष्ट्र नगरपरिषद (स्थावर मालमत्ता हस्तांतरण) नियम १९८३ नुसार आवश्यक कार्यवाही करावी.
३. ज्या प्रकरणी शासन मान्यतेची आवश्यकता आहे. त्याप्रकरणी शासनाची यथोचित पूर्व मान्यता प्राप्त करावी.
४. संबंधीत स्थावर मालमत्ता भाडे तत्वावर / कायमस्वरुपी देताना तसेच त्यांना विकास कारताना याबाबतच कार्यवाही ई-निविदा/ ई-लिलाव प्रक्रिया राबवून देण्यात यावी.
५. अधिनियमातील तरतुदीनुसार भाडे पट्टयाने जमीनी देताना/ कायमस्वरुपी देताना याकरिता आकारावयाच्या मोबदल्याची रक्कम कोणत्याही परिस्थितीत बाजार मुल्यापेक्षा कमी असता कामा नये.
६. स्थावर मालमत्ता भाडयाने देताना / कायमस्वरुपी देताना / विकसित करताना ज्या प्रयोजनार्थ संबंधीत जमीन आरक्षित आहे, त्याच प्रयोजनार्थ जमीन देण्यात यावी.
७. स्थावर मालमत्ता उपरोक्तप्रमाणे भाडयाने देताना / कायमस्वरुपी देताना / विकसित करताना या संबंधी करारनामा करताना नागरी स्थानिक संस्थेचे हित पूर्णपणे जोपासले जाईल याची दक्षता घेण्यात यावी.

८. स्थावर मालमत्ता ज्याप्रयोजनार्थ देण्यात आलेल्या आहेत. त्याच प्रयोजनार्थ त्याचा वापर होत आहे याबाबत संबंधीत नागरी नियमितपणे आढावा घ्यावा.

९. नगरपरिषद व नगरपंचायती संदर्भात स्थावर मालमत्ता हस्तांतरण करण्यापूर्वी करारनाम्याच्या प्रारुपास आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय यांच्याकडून मान्यता प्राप्त करावी.

१०. विहित अटी व शर्तीचे उल्लघन झाल्यास संबंधीत मालमत्ता नगरपालिकेच्या / महानगरपालिकेच्या ताब्यात घेण्यात येईल अशा स्वरुपाची अट करारनाम्यात अंतर्भूत करावी.

११. स्थावर मालमत्ता ज्या अटी व शर्तीवर देण्यात आलेल्या आहेत त्या अटी व शर्तीचा भंग होत असल्यास झाला असल्यास करारनाम्यातील अटी व शर्तीनुसार पुढील कार्यवाही तात्काळ करण्यात यावी. वरील प्रमाणे तरतुद आहे.

सदर पोलिस चौकी मुळे स्टेशन चौकातील महापालिका गाळयांना सरंक्षण प्राप्त होणार आहे. गाळेधारकाचे व गाळयांचे नुकसान होणार नाही, याकारणास्तव सदर चौकीत मे. पोलिस अधीक्षक यांचे कडे वापरासाठी हस्तांतरीत करणेची झाल्यास खालीलप्रमाणे अटींचा समावेश करारपत्रात करणे उचित वाटते.

१) इमारत ही कायम स्वरुपी व पूर्णतः महानगरपालिकेच्या मालकीची राहणार आहे.

२) वापरासाठी हस्तांतरीत केल्या नंतर त्याचा वापर चालु असे पर्यंत देखभाल व दुरुस्ती ही पोलिस खात्यानेच करणेची आहे. यासाठी त्यांना मनपा कडून कोणत्याही अर्थिक मोबदला मिळणार नाही.

३) बांधकाम केलेल्या इमारतीमध्ये किंवा त्याबाहेर कोणत्याही इतर बांधकाम किंवा फेरबदल करणेचा नाही.

४) इमारतीचा वापर हा पोलिस विभागाकडून या भागातील दुकानदार व राहिवाशी यांची सुरक्षितता व कायदा सुव्यवस्था यासाठी करणेचा आहे.

५) वरील जागेचा वापर महानगरपालिकेस इतर कोणत्याही अत्यावश्यक कारणासाठी करणेचा झालेस ती त्वरीत काढून घेण्याचे अधिकार पूर्णतः महानगरपालिकेचे राहतील.

वरील प्रमाणे प्रस्तावास ही सभा मान्यता देत असून, उपरोक्त अटी नमुद करुन मे.पोलिस अधीक्षक सांगली यांना अथवा त्यांनी प्राधिकृत केलेले अधिकारी यांना देण्याचे झाल्यास करारपत्र व ताबा पावती करुन देणेबाबत, प्रशासक ठराव क्रं.२७ दि.०१/०७/२०२४ व मा. आयुक्तसो यांनी दिलेल्या सूचनेनुसार वार्षिक र.रु.१००/- + जी.एस.टी.भाडे ठरविण्यात आलेले आहे. सदरचे भाडे भरणा केल्यानंतर त्यांना ताबा पावती व करारपत्र करुन देणेसाठी ही सभा ओदशित करीत आहे.

तसेच आमराई येथील पोलीस चौकी पाडल्यामुळे छ. शिवाजी स्टेडियम मधील दुकान गाळयामध्ये पोलीस चौकी सुरु करण्यात आलेली होती. सदर चौकीमध्ये पोलीस कार्यरत नसलेमुळे विना वापर पडून आहे, त्याकरिता छ. शिवाजी स्टेडियम मधील पोलीस चौकी करिता दिलेला दुकान गाळा मनपाच्या ताब्यात घेणेसाठी पुढील योग्यती कार्यवाही ठेवणेस ही सभा आदेशित करीत आहे.

(शुभम गुप्ता भा.प्र.से.)
प्रशासक तथा आयुक्त
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

मालमत्ता अधिकारी

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सर्वसाधारण प्रशासक सभा क्रमांक :- ११/२०२४-२५

सर्वसाधारण प्रशासक ठराव क्रमांक :-१३२ **दिनांक :- ११/१०/२०२४**

विषय क्रमांक :- ०९

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील दि.२४/०८/२०२३ रोजीचे आदेशान्वये प्रशासक म्हणून प्राप्त अधिकारानुसार सर्वसाधारण सभेच्या अधिकारांन्वये,

सोबतचे उपायुक्त मुख्यालय (घनकचरा व्यवस्थापन कक्ष) यांचे दि.०९/१०/२०२४ रोजीचे विषयपत्र अवलोकनी घेतले.

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये एकूण २० वॉर्ड आहे. या वॉर्डामध्ये आरोग्य विभागामार्फत घरोघरी दैनंदिन रिक्षा घंटागाडी फिरती करुन ओला व सुका कचरा संकलित करण्याची कामगिरी करण्यात येत आहे. सदर संकलित होणारा कचरा त्या प्रभागामध्ये ठेवण्यात आलेल्या कंटेनरमध्ये एकत्रित करण्यात येतो. तद्नंतर कंटेनरमध्ये जमा झालेला कचरा कॉम्पॅक्टर वाहनाव्दारे वाहून ते जवळील कचरा डेपोमध्ये प्रक्रिया करणेकरीता देण्यात येतो. याकामी महानगरपालिका क्षेत्रात प्रभाग समितीनिहाय ओला व सुका कचरा Transfer Station उभारणी केलेस वेळेचा व पैशाची बचत होऊन आर्थिक लाभ होण्यास मदत होणार आहे.

सद्यस्थितीमध्ये महानगरपालिकेस स्वच्छ भारत मिशन (नागरी) अंतर्गत घनकचरा व्यवस्थापना करीता अनुदान प्राप्त असुन त्याचा तपशिल खालीलप्रमाणे....

अ.क्र.	प्रकल्पाचे नाव	केंद्र शासन अनुदान हिस्सा	राज्य शासन अनुदान हिस्सा	महापालिका स्व-हिस्सा	एकूण
१.	Composting Plant (for WET Waste)	१,३२,८२,५००/-	१,४८,९२,५००/-	१,२०,७५,०००/-	४,०२,५०,०००/-
२.	MRF cum RDF	१,९९,१५,५००/-	२,२३,२९,५००/-	१,८१,०५,०००/-	६,०३,५०,०००/-
३.	SLF	६३,२३,४६०/-	७०,९०,६८०/-	५७,४९,८६०/-	१,९१,६४,०००/-
				एकूण	११,९७,६४,०००/-

उपरोक्त प्रमाणे नमुद केलेनुसार स्वच्छ भारत मिशन (नागरी) अंतर्गत अनुदान प्राप्त होणार आहे. उक्त प्राप्त अनुदानामधून महानगरपालिका कार्यक्षेत्रात ओला व सुका कचरा Transfer Station उभारणी करणेकामीचा सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) तयार केलेस ओला व सुका कचरा एकत्रित संकलित करणेस सोयीचे होणार आहे. उक्त सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणेकामी स्वचछ भारत मिशन (नागरी), Empanelment Order मध्ये पुणे विभागाकरीता (१) Ma RS Planning and Engineering Services Pvt. Ltd. (२) All India Institute of Loical Self-Government व (३) Samarth Engineers असे एकूण तीन एजन्सी मान्यता प्राप्त आहेत. या नमूद एजन्सीपैंकी एका एजन्सीची नियुक्ती करुन सविस्तर प्रकल्प तयार करुन घेणेबाबत मान्यता देण्यात आलेली आहे.

त्याअनुषंगाने या तिन्ही एजन्सींना दि.११/०९/२०२४ रोजी मा. उपायुक्तसो (मुख्यालय) यांचे दालनामध्ये DPR तयार करणेबाबत बैठकीमध्ये बोलविण्यात आले. त्यानुसार चर्चे अंती मा. उपायुक्तसो यांनी Samarth Engineers, Pune यांना महानगरपालिका क्षेत्रात प्रभाग समितीनिहाय ओला व सुका कचरा Transfer Station उभारणी करणेबाबतचा र.रु.११,९७,६४,०००/- मात्र रकमेचा सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) तयार करणेची कामगिरी सोपविण्याबाबत सुचित केले आहे. सदर प्रकल्प अहवाल तयार करणेकामी Empanelment Order मध्ये निश्चित केलेनुसार प्रकल्प अहवालाच्या रकमेच्या २.५५% इतकी फी म्हणजे र.रु.३०,५३,९८२/- मात्र इतका खर्च होणार आहे.

महानगरपालिका कार्यक्षेत्रात प्रभाग समिती निहाय ओला व सुका कचरा Transfer Station उभारणी करणेबाबत र.रु.११,९७,६४,०००/- मात्र रकमेचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणेकामी Samarth Engineers, Pune यांचेकडून कामगिरी करुन घेणेस, करारपत्र करणेस व याकामी र.रु.३०,५३,९८२/- मात्र फी अदा करणेस विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे.

वै. आरोग्याधिकारी

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका

(शुभम गुप्ता भा.प्र.से.)
प्रशासक तथा आयुक्त
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका